# मोफत वाहन तपासणी शिबीर नांन्नज

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा संचालित लोकमंगल संस्थेच्या 25 व्या रोप्यामहोत्सवा निमित्त लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वडाळा आयोजित मोफत वाहन तपसणी शिबीरास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात लोकमंगल औद्योगिक प्राशिक्षण संस्थेमधील विद्यार्थ्यांनी नांन्नज गावातील दुचाकी वाहने, ट्रॅक्टर डिझेल वाहने तसेच, लाईट मोटार व्हेईकल इत्यादी वाहनांची मोफत तपासणी तसेच मोफत सर्व्हिसिंग ची कामे केली. या शिबिराचे प्रमुख पाहुणे म्हणून नांन्नज गावचे सरपंच माननिय श्री दादा टोणपे, उपसरपंच माननिय श्री दीपक अंधारे तसेच नांन्नज गावचे ग्रामस्थ उपस्थित होते. लोकमंगल औद्योगिक प्राशिक्षण संस्थेमधील डिझेल यांत्रिकी विभागाचे निदेशिक श्री प्रदीप विटकर सर आणि श्री रणजित गाडे सरांनी शिबिराच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तसेच मोटार सायकल विभागाचे निदेशक श्री राहुल गवळी सरांनी सूत्रसंचालन केले.





नांन्नज गावचा सोमवार हा बाजार दिवस असल्यामुळे आजूबाजूच्या गाव-खेड्यातून बाजारासाठी आलेल्या जास्तीत जास्त ग्रामस्थांना या शिबिराचा लाभ घेता यावा याकरिता 50 विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून सेवा दिली. दरम्यान असे शिबीर प्रत्येक गावात राभविणार आहोत असे लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.




HONDA


ग्रामपंचायत नानज उ.सोलापूर
ऑद्योगिक प्रशिक्षण संस्थ
रौप्य महोत्सव २०२२-२३
अंतर्गत
विविध उपक्रम
जिल्हा
पुढे
Shot on OnePlus
By BIKE RIDER 2022.11.21 11:26


ता.उ.सोलापूर
जि.सोलापूर
Shot on OnePlus
By BIKE RIDER